तरुण भारत
शनिवार, २ ऑगस्ट २०२५

# सांगली येथील टेबल टेनिस स्पर्धेत अनिश सोनटक्केची सुवर्ण कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

सांगली येथे घेण्यात आलेल्या दुसरी स्टेट रँकिंग टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयातील बीकॉम भाग तीनचा विद्यार्थी अनिष सोनटक्के याने ओपन सिंगल टेबल टेनिस स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक मिळवले. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आजपर्यंतचा तो पहिला खेळाडू ठरला आहे.

राज्य स्तरावर टेबल टेनिस स्पर्धेमध्ये सुवर्ण पदकाची कमाई करणारा एकमेव खेळाडू आहे. त्याला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले, वडील सतीश सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेनंतर मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक स्विकारताना खेळाडू अनिश सोनटक्के.

पुण्यनगरी ३ | गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५

# मौनातल्या भावनांना शब्दांत व्यक्त करा : प्रा. राजा माळगी

## विवेकानंद कॉलेजमध्ये 'वाङ्मय मंडळा'चे उद्घाटन



कोल्हापूर : साहित्य हे नवनवीन उन्मेष धारण करणारे असते. मौनातल्या भावनांना शब्दांत व्यक्त करून लिहिते व्हा, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक व व्याख्याते प्रा. राजा माळगी यांनी केले. विवेकानंद कॉलेजमधील वाङ्मय मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. माळगी म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजामधील अज्ञानाचा अंधकार दूर केला आहे. माणसाला व्यक्त होता आले पाहिजे. डार्विनने सांगितलेल्या उत्क्रांतीच्या सिद्धांताप्रमाणे माणसाचा मेंदू नष्ट होईल. साहित्यिक होणे सोपे आहे. त्यासाठी फक्त शब्दांशी खेळता आले पाहिजे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात रोपास पाणी घालून आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक व स्वागत वाङ्मय मंडळाचे प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रदीप पाटील यांनी करून दिला. आभार डॉ. कविता तिवडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. कार्यक्रमास डॉ. दीपक तुपे, डॉ. स्नेहा देसाई, प्रा. रोहिणी रेळेकर, प्रा. अश्विनी खवळे, प्रा. आरती कुलकर्णी आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी
दि. ०७.०८.२०२५
सकाळ

# सस्नेह निमंत्रण

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३८ वा स्मृतिदिन

**कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा. प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे**

**प्रमुख पाहुणे : मा. ना. पंकज भोयर साहेब**
(राज्यमंत्री, शालेय शिक्षण, गृह (ग्रामीण), सहकार, खनिकर्म, गृहनिर्माण)

**प्रमुख वक्ते : श्री. अविनाश भारती**
(सुप्रसिद्ध कवी व व्याख्याते)

विषय :
आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांचे विचारधन

**निमंत्रक : प्राचार्या सौ. शुभांगी गावडे**
(सचिवा, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर)

कार्यक्रम वेळ :
शुक्रवार,
दिनांक ८ ऑगस्ट,
सकाळी १०.३०
वाजता

कार्यक्रम स्थळ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर

तरुण भारत संवाद

गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५

# दोन्ही किडन्या फेल झालेल्या प्राजक्ताला हवा मदतीचा हात

**कोल्हापूर :** वडिल किडनी देणार होते, मात्र दोन महिन्यापूर्वी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबरोबर तिची किडनीची अपेक्षाही संपली. दोन्हीही किडन्या फेल आहेत. आता जगण्यासाठी आठवड्यातून तीन वेळा डायलेसीस करावयाचा खर्च आहे. सरनोबतवाडी मनोरमळा (ता.करवीर) येथील प्राजक्ता किशोर गायकवाड हिला गरज आहे आर्थिक मदतीची.

गायकवाड विवेकानंद महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत आहे. तीन वर्षांपासून तिला त्रास होऊ लागला. वैद्यकीय तपासणीत तिच्या दोन्ही किडन्या फेल असल्याचे निदर्शनास आले. दोन्ही किडन्या फेल झाल्याने जगणे तिला अवघड झाले आहे. महिन्यातून तीन वेळा तिला डायलेसीस करावे लागत आहे. तिच्या मागे घरकाम करणारी आई, एक भाऊ, बहिण आहेत.

**दानशुरांना मदतीचे आवाहन**

तिच्या मदतीसाठी दि जळगाव पिपल्स को. ऑ. बँक लि या बँकेच्या ३८०५०००००७८५ (आयएफएससी jpcb0000038) या प्राजक्ता किशोर गायकवाड या नावावर पैसे जमा करण्याचे आवाहन तिने केले आहे.

**ऋतुराज पाटील यांची मदत**

माजी आमदार ऋतुराज पाटील यांनी गायकवाड हिच्या वैद्यकीय खर्चाची जबाबदारी घेतली आहे. डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. आई खासगी ठिकाणी काम करते आहे. उदरनिर्वाहाबरोबर वैद्यकीय खर्चासाठी अजूनही तिला मदतीची गरज आहे. दानशुरांनी बँकेच्या खात्यावर किंवा ७७५६९४९०४३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन प्राजक्ताने केले आहे.

पुण्य नगरी
कोल्हापूर । शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : ज्ञानयोगी, कर्मयोगी

**शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ८ ऑगस्ट २०२५ रोजी स्मृतिदिन आहे. या निमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला थोडक्यात आढावा.**

समाजातील बहुजनांच्या शिक्षणासाठी आयुष्य खर्ची घालणारे महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यांत व कर्नाटकातील एका जिल्ह्यात ज्ञानगंगा घरोघरी पोहोचविणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे. त्यांचा जन्म दि. ९ जून, १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील रामापूर या छोट्या गावात झाला. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गुरुदेव कार्यकर्त्यांच्या साथीने महाराष्ट्राच्या उस्मानाबाद, पुणे, सातारा, रायगड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पेण, बेळगाव अशा जिल्ह्यांमध्ये ज्ञानमंदिरे उघडून येथील जनतेच्या शिक्षणाची सोय केली.

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ध्येयवादाने प्रेरित होऊन त्यांनी १९५४ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षणाने माणूस ज्ञानी व सुसंस्कारी



व्हावा, यासाठीच त्यांनी शिक्षण प्रसाराचे सतीचे वाण हाती घेतले. खेड्यामध्ये, वाड्या-वस्त्या व आदिवासी पाड्यामध्ये जाऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. आज या संस्थेची ४०० शैक्षणिक संकुले शाळा, महाविद्यालये बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षण दहा हजार गुरुदेव कार्यकर्त्यांच्या साथीने भारताची तरुण पिढी आत्मविश्वासाने घडवत आहेत. बापूजींच्या शैक्षणिक कार्यात त्यांच्या पत्नी संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच बापूजी तेरा जिल्ह्यांत संस्कार केंद्रे उभी करू शकले. ग्रामीण भागात राहणाऱ्या समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहोचविण्याच्या केलेल्या कार्यामुळे शासन व विविध संस्था यांनी बापूजींना मानपत्र दिले. बापूजींच्या पवित्र स्मृतीस कोटी कोटी प्रणाम.

- हितेंद्र साळुंखे, सहायक ग्रंथपाल,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५

# डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनी आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ३८ वा स्मृतिदिन शुक्रवारी (दि.८) सकाळी १०.३० वाजता स्मृतिभवन येथे होणार आहे. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर उपस्थित राहणार आहेत.

अविनाश भारती 'आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांची विचारधारा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार आहे. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्य शुभांगी गावडे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) एस. एम. गवळी, संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

लोकमत

शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिन निमित्त आयोजित कार्यक्रमात शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत बापूजी साळुंखे यांचे मोलाचे योगदान

## पंकज भोयर : ३८ व्या स्मृतिदिननिमित्त कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था ही महाराष्ट्रातील नावलौकिक असलेली संस्था असून, त्यांच्यामुळे डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार अध्यक्षस्थानी होते.

राज्यमंत्री भोयर पुढे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १२ जिल्हे आणि बेळगावसह एकूण १४ जिल्ह्यांत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यांनी निर्माण केलेल्या संकुलांमधून त्यांचा द्रष्टेपणा दिसतो. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी स्वागत केले. डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सीताराम गवळी यांनी आभार मानले. यावेळी सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, उपाध्यक्ष अविनाश पाटील, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी उपस्थित होते. (वा.प्र.)

लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५

# डॉ. बापूजी साळुंखे यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. शिक्षणशास्त्र अधिविभाग येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या उपस्थितीत पुष्पहार व पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र विभागाचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आदी उपस्थित होते.

# समाज घडविण्याची शिक्षकांवर मोठी जबाबदारी

## शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर; शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यामुळेच महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. विद्यार्थ्यांना बहुज्ञानशाखीय शिक्षणाला सामोरे जावे लागणार आहे. या अस्वस्थ वर्तमानाच्या काळात बापूजींच्या विचारांचे स्मरण व अंगिकार करायला हवा. बापूजींना अभिप्रेत असणारा शिक्षकच चांगला समाज घडवू शकतो, असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केले.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर. समवेत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कौस्तुभ गावडे आदी.

(छाया : नाज ट्रेनर)

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी कवी अविनाश भारती यांचे 'आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांची विचारधारा' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले, ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार हा ध्येयवाद सर्वांनी आचरणात आणून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान द्यावे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर विश्वास ठेवावा आणि शिक्षकांनी तो विश्वास सार्थ करावा. तरच, येणाऱ्या काळात सुजाण नागरिक घडतील.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षणातील संघर्ष व आव्हाने ओळखून शिक्षण क्षेत्रात अव्याहत कार्य केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना शिक्षकांनी सजग असणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर स्वार होण्याचे आव्हान शिक्षकांनी स्वीकारले पाहिजे. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शाळा सिद्धी मूल्यमापन अंतर्गत विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सहसचिव (प्रशासन) सीताराम गवळी यांनी आभार मानले. डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश पाटील, संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

तरुण भारत संवाद
शनिवार, ९ ऑगस्ट २०२५

# डॉ. साळुंखेंचे महाराष्ट्राच्या जडण-घडणीत योगदान

- राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांचे प्रतिपादन
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर, सोबत शुभांगी गावडे, अभयकुमार साळुंखे, अविनाश भारती, कौस्तुभ गावडे, डॉ. आर. आर. कुमार आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील नावलौकिक असलेली शिक्षण संस्था आहे. महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे, असे प्रतिपादन राज्य शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

भोयर म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १२ जिल्हे आणि बेळगावसह १४ जिल्ह्यात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. त्यामुळे बापूजींचे द्रष्टेपण त्यांनी खेडोपाड्यात निर्माण केलेल्या संकुलांमधून दिसते. कवी व व्याख्याते अविनाश भारती म्हणाले, बापूजींनी सांगितलेला 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' या ध्येयवादाचे आचरण केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर विश्वास ठेवावा आणि शिक्षकांनी तो विश्वास सार्थ करावा. तरच सुजाण नागरिक घडतील. बापूजींची प्रार्थना, शैक्षणिक विचार आणि तत्त्वज्ञानामधील मार्गदर्शक तत्त्वांचा संदर्भ नव्या शैक्षणिक धोरणात आहे. बापूजींच्या सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा या पंचसूत्रीचा अवलंब केला पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शाळा सिद्धी मूल्यमापन अंतर्गत विजेते म्हणून प्रथम क्रमांक विवेकानंद कॉलेज, द्वितीय क्रमांक जतमधील राजे रामराव महाविद्यालय, तृतीय क्रमांक तासगावातील पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाल येथील कलाशिक्षक विजयकुमार शिंगण यांनी शिवराज्याभिषेक रांगोळी काढून लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केल्याबद्दल त्यांचा सत्कार केला.

संस्थेच्या कला शिक्षकांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन केले. स्वागत, प्रास्ताविक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. आभार संस्थेचे सहसचिव (प्रशासन) सीताराम गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, उपाध्यक्ष अविनाश पाटील, सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार आदी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर
रविवार, १० ऑगस्ट २०२५

# 'विवेकानंद'मधील 'परदेशातील उच्च शिक्षण संधी' विषयावरील वेबिनारला प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'परदेशातील उच्च शिक्षण संधी' या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले. वेबिनारमध्ये महाविद्यालयातील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या वेबिनारमध्ये प्रमुख वक्त्या म्हणून ओचव्हर्स ॲकॅडमीच्या संस्थापक पल्लवी देसाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. वेबिनारमध्ये परदेशातील उच्च शिक्षण घेण्यासाठी लागणारी तयारी, प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती योजना, व्हिसा व निवासव्यवस्था याबाबत माहिती देण्यात आली. सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध शंकांचे निरसन करून आवश्यक सल्ला घेतला. कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहुण्यांची ओळख वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी करून दिली. वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. प्रिया पाटील व डॉ. स्नेहल वाडकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. आर. कासारकर यांनी आभार मानले.

सकाळ
दि. 11/08/2025

# शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे स्मृती ज्योत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या स्मृतिदिनानिमित्त बापूजी साळुंखे स्केटिंग प्रशिक्षण केंद्राच्यावतीने स्मृती ज्योत मिरवणुकीने स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आणली. ज्योत जुन्या विवेकानंद कॉलेज (जुना बुधवार पेठ) येथे त्यांच्या स्नुषा इंदिराबाई साळुंखे हस्ते व ऐश्वर्या साळुंखे यांच्या उपस्थितीत प्रज्वलित केली. यावेळी कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे यांनी अभिवादन केले. स्केटिंग प्रशिक्षक डॉ. महेश कदम, भास्कर कदम, ॲड. धनश्री कदम, योगिता मोरपडे, सागर कुंभार, मेघशाम जगताप उपस्थित होते.

सकाळ
दि. 11/08/2025

# कोल्हापुरी बोली




प्रत्येक भागाची विशिष्ट बोलीभाषा असते. ती प्रमाणभाषेपेक्षा थोडी वेगळी असून, तिच्या शब्दसौंदर्याला त्या भागातील मातीचा सुगंध असतो. याचप्रमाणे 'कोल्हापुरी बोली : तत्त्व आणि व्यवहार' या पुस्तकात प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी कोल्हापूरच्या बोलीभाषेविषयीची सविस्तर माहिती दिली आहे. कोल्हापुरी बोलीबद्दलची वैशिष्ट्ये टिपत असताना त्यांनी या बोलीचा उगम, परिचय, व्यवहार, वापर या मुद्द्यांवरही प्रकाश टाकला आहे. कोल्हापुरी बोलीची सैद्धान्तिक चर्चा करत असताना त्यांनी आपली मांडणी बोजड होऊ दिलेली नाही.

- **वैशिष्ट्य :** कोल्हापुरी बोलीतील, शब्द, त्यांचा अर्थ, म्हणी, वाक्प्रचार यांची यादी व उपयोग.
- **प्रकाशक :** तेजश्री प्रकाशन
- **पृष्ठे :** १०० ● **मूल्य :** १८० रु.

पुढारी | ४
सोमवार । ११ ऑगस्ट २०२५

# विवेकानंद महाविद्यालयातील वेबिनारला प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'परदेशातील उच्च शिक्षण संधी' या विषयावर वेबिनार झाला. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. वेबिनारमध्ये ऑक्सिस अ‍ॅकॅडमीच्या पल्लवी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. देसाई यांनी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेताना येणाऱ्या संधी, करिअरच्या दृष्टीने फायदे तसेच सांस्कृतिक अनुभव याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहुण्यांची ओळख वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी करून दिली. डॉ. ए.आर. कासारकर यांनी आभार मानले. वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. प्रिया पाटील व डॉ. स्नेहल वाडकर यांनी सूत्रसंचालन केले. वेबिनारमध्ये महाविद्यालयातील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'चे प्रा.विराज जाधव यांची दुहेरी कामगिरी

## अभिनव उपकरणांना भारत सरकारकडून पेटंट मान्यता

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद महाविद्यालयातील बी.बी.ए. व एम.बी.ए. विभागप्रमुख प्रा.विराज विजय जाधव यांनी डिझाईन केलेल्या एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर आणि एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर या उपकरणांना भारत सरकारकडून पेटंट मान्यता मिळाली आहे. एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर-गंभीर रुग्णासाठी हॉस्पिटलमधील व्हेंटिलेटरवर अवलंबून राहणे महागडे व जिकिरीचे ठरते. या पोर्टेबल घरी. व्हेंटिलेटरची सुविधा देता येऊ शकते. एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर-वाढत्या प्रदूषणामुळे श्वसनविकार वाढत आहेत. टख (एअर क्वॉलिटी इंडक्स) नुसार हवा शुद्ध करणारे हे उपकरण लहान व हलके असल्याने ते सहज सोबत नेता येते. या संशोधन कार्यासाठी प्रा. जाधव यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा सौ.शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांचे मार्गदर्शन



# हॅलो प्रभात

## 'शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे विचारधन' पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे विचारधन या पुस्तकाचे प्रकाशन व विविध गुणवंतांचा सत्कार कार्यक्रम उत्साहात पार पडला.सिद्धी' मूल्यांकनांतर्गत प्रथम क्रमांक विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, द्वितीय क्रमांक राजे रामराव महाविद्यालय, जत व तृतीय क्रमांक पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी पाल येथील कलाशिक्षक विजयकुमार शिगण यांनी साडेचार एकर परिसरात शिवराज्याभिषेक विषयावर रांगोळी काढून लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद केली असून त्यांचा विशेष सत्कार झाला.याप्रसंगी डॉ.मच्छिंद्र नांगरे लिखित 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे विचारधन' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमात कलाशिक्षकांच्या ६०० हून अधिक कलाकृतींचे प्रदर्शन तसेच मध्याध्यापकांसाठी परिसंवाद आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये डॉ. मच्छिंद्र नांगरे, डॉ. कविता तिवडे, प्रा.सुप्रिया पाटील, सहसचिव (प्रशासन) सिताराम गवळी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, कलाशिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कविता तिवडे व प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. आभार सिताराम गवळी यांनी केले.

हॅलो प्रभात

# ‘विवेकानंद’च्या बालकल्याण संकुलात रक्षाबंधन उत्सव



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद . महाविद्यालय, कोल्हापूर यांच्या ज्युनिअर व सिनिअर एनएसएस विभागामार्फत मंगळवार पेठ येथील बालकल्याण संकुलात रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात एनएसएसमधील विद्यार्थिनींनी संकुलातील मुलांना राख्या बांधून व पेढा भरवून भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक असणारा रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.आर. बागडे, डॉ.अभिजीत पाटील, प्रा.सौ.शुभांगी पाटील आणि प्रा. सौ.एम. के.पोवार उपस्थित होते. कार्यक्रमात ५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.हा उपक्रम विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पार .पडला. महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री.धनवडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

epaper.helloprabhat.in
13 Aug 2025 - Page 3

Hello Prabhat - 13 Aug 2025 - Page 5

हॅलो प्रभात

# ग्रंथालय शास्त्राच्या चाकोरीत डॉ.रंगनाथन यांचा मोलाचा वाटा : कौस्तुभ गावडे



## विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ.रंगनाथन जयंती साजरी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे आज अभिवादन कार्यक्रम पार पडला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी भाषणात श्री.गावडे म्हणाले, ग्रंथालये साचेबद्ध शास्त्रीय चाकोरीत आणण्याचे श्रेय डॉ. रंगनाथन यांना जाते. वाचन हा समृद्ध जीवनाचा राजमार्ग आहे. विद्यार्थ्यांची पावले नेहमी ग्रंथालयाकडे वळली पाहिजेत, हीच पावले त्यांना यशाकडे घेऊन जातील, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुंभार होते. स्वागत व प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथपाल श्री.साळुंखे यांनी केले. कार्यक्रमात श्री. साळुंखे, श्री.नार, श्री.खोत, श्री.जाधव, श्री. इंगळे, सौ.प्रमोदिनी जाधव, सौ.प्रियांका दुर्गुळे, श्री.पाटील यांनी संयोजन केले. यावेळी डॉ.रंगनाथन यांच्या कार्यावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शनही भरविण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे व सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी या उपक्रमास प्रोत्साहन दिले.

तरुण भारत
बुधवार १३ ऑगस्ट २०२५

# प्रा. विराज जाधव यांच्या दोन उपकरणास पेटंट

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विवेकानंद महाविद्यालयामधील बी. बी. ए. व एम बी ए. विभागप्रमुख प्रा. विराज जाधव यांच्या दोन उपकरणांना भारत सरकारकडून पेटंट मिळाले आहे. त्यांनी डिझाईन केलेल्या एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर व एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर या उपकरणांच्या डिझाइनवर संशोधन केले आहे.



एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर–कुटुंबातील एखादा रुग्ण व्हेंटिलेटरवर ठेवले जाते. त्यानंतर त्या व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये ठेवणे हे खर्चाचे व जिकरीचे होते. अशावेळी पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर मुळे तुम्ही एखाद्या रुग्णाला घरच्या घरी व्हेंटिलेटरची सुविधा देऊ शकता. एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर उपकरण–

**▪ एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर उपकरणाच्या व एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर डिझाईनचे संशोधन**

सध्याच्या वाढत्या प्रदूषणाच्या काळात श्वसनाचे विकार होत आहेत. असे असताना हवेतील प्रदूषणाच्या एक्यूआय एअर क्वालिटी इंडिकसप्रमाणे हवा शुद्ध करण्याचे काम हा एअर प्युरिफायर करतो. लहान आकारामुळे तुम्ही सोबत घेऊन कुठेही त्याचा वापर करू शकता.

सदर संशोधन कार्यामध्ये प्रा. विराज जाधव यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा शुभांगी गावडे, यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे विशेष सहकार्य लाभले.

दैनिक **महासत्ता** इचलकरंजी | बुधवार, ता. १३ ऑगस्ट २०२५

# विद्यार्थ्यांनी स्क्रीन टाईम स्टडी टाईम करावा

## –जिल्हाधिकारी येडगेंचा युवकांना यशस्वी मूलमंत्र



कोल्हापूर– आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी सहाय्यता जनजागृती अभियान कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे.

■ कोल्हापूर, ता. १२ (प्रतिनिधी)

युवक ही आपल्या देशाची शक्ती असून मजेत जीवन जगताना ध्येय निश्चित करा.. व्यसनांपासून दूर रहा. स्क्रीन टाईम हा बुक टाईम, ग्राउंड टाईम आणि स्टडी टाईम बनवा. अधिकाधिक ज्ञान मिळवा. खडतर परिश्रम घेऊन उत्तम करिअर घडवा आणि यशस्वी होऊन आपल्या जिल्ह्याचे नाव जगभरात उज्वल करा, अशा शब्दांत यशस्वी जीवनाचा मूलमंत्र जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी युवकांना दिला.

जिल्हा प्रशासन, सहायक आयुक्त समाज कल्याण, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी सहाय्यता जनजागृती अभियान कार्यक्रम जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे पार पडला.

जिल्हाधिकारी श्री. येडगे म्हणाले, देशाचे भवितव्य युवकांच्या हाती आहे. युवा दशेत खडतर परिश्रम घेतलेल्या अनेक व्यक्तींनी देशाचे नेतृत्व केले आहे तर बिरदेव डोणे यांच्यासारख्या युवकांनी ध्येयाप्रती एकनिष्ठ राहून भरघोस यश मिळवले आहे. उठा, जागे व्हा, उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत थांबू नका ही शिकवण देणारे स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी चौफेर व्यक्तिमत्व घडवावे. शासकीय योजनांचा लाभ घेऊन विकास साधावा. मोठे स्वप्न बघा. ध्येय निश्चित करा. ते पूर्ण करण्यासाठी खडतर परिश्रम घ्या. चांगले मित्र जोडा. व्यसनांपासून दूर राहण्याचे आव्हान स्वीकारा.

यावेळी सारथी उपकेंद्राच्या सह व्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन साळे, पोलीस उप निरीक्षक सायली पडवळ, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रख्यात व्याख्याते प्रा. मधुकर पाटील तसेच अन्य मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उत्पन्नाचा दाखला, राष्ट्रीयत्वाचा दाखला, जात व नॉन क्रिमीलेअर दाखल्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्रा. प्रवीण बागडे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

लोकमत
कोल्हापूर, बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५

मस्ट READ

# विद्यार्थ्यांनो, स्क्रीन टाइमला बनवा स्टडी टाइम

## जिल्हाधिकारी येडगे यांनी दिला युवकांना कानमंत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** युवकांनो, मजेत जीवन जगताना ध्येय निश्चित करा.. व्यसनांपासून दूर रहा. स्क्रीन टाइम हा बुक टाइम, ग्राउंड टाइम आणि स्टडी टाइम बनवा. अधिकाधिक ज्ञान मिळवा. यशस्वी होऊन आपल्या जिल्ह्याचे नाव जगभरात उज्ज्वल करा, अशा शब्दांत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी युवकांना यशस्वी जीवनाचा मूलमंत्र दिला.



कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात मंगळवारी झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जिल्हा प्रशासन, सहायक आयुक्त समाज कल्याण, बार्टी, सारथी, महाज्योती, विवेकानंद कॉलेजच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित जनजागृती अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी सारथी उपकेंद्राच्या सहव्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी, समाजकल्याण सहायक आयुक्त सचिन साळे, पोलिस उपनिरीक्षक सायली पडवळ, विवेकानंद संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. मधुकर पाटील उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, आत व नॉन क्रिमीलेअर, दाखल्यांची माहिती देण्यात आली.

जिल्हाधिकारी येडगे म्हणाले, बार्टी, महाज्योती, सारथी संस्थांच्या योजनांचा लाभ घ्या. महाविद्यालय व परिसर अमली पदार्थ मुक्त राहण्यासाठी प्रयत्न करा.

किरण कुलकर्णी यांनी शासनाच्या योजनांची माहिती युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी महाविद्यालयांमध्ये समन्वय समिती स्थापन करण्यात येत असल्याचे सांगितले. पोलीस उपनिरीक्षक सायली पडवळ यांनी अनोळखी व्यक्तीशी सोशल मीडियाद्वारे संपर्क वाढवू नका, वैयक्तिक माहिती सोशल मीडियाद्वारे पाठवू नका, असे सांगितले. मधुकर पाटील यांनी 'मोबाइल ॲडिक्शन युवकांपुढील आव्हान' या विषयावर व्याख्यान दिले. कौस्तुभ गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. प्रवीण बागडे यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ
TODAY
कोल्हापूर, बुधवार, १३ ऑगस्ट २०२५

# खडतर परिश्रम घेऊन उत्तम करिअर घडवा

## जिल्हाधिकारी; परिसर अमली पदार्थमुक्त ठेवण्याचे आवाहन



**कोल्हापूर** : डॉ. बापूजी साळुंखे भवन येथे सोमवारी आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १२ : 'विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहावे, स्क्रीन टाईम हा बुक टाईम, ग्राऊंड टाईम आणि स्टडी टाईम बनवावा. अधिकाधिक ज्ञान मिळवावे. खडतर परिश्रम घेऊन उत्तम करिअर घडवून जिल्ह्याचे नाव जगभरात उज्ज्वल करावे', असा मूलमंत्र आज जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी येथे दिला. त्याचबरोबर महाविद्यालय परिसर अमली पदार्थमुक्त राहण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर असून, त्यांनी ती पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा प्रशासन, सहायक आयुक्त समाजकल्याण, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी सहाय्यता जनजागृती अभियानाचे नागाळा पार्क येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी सारथी उपकेंद्राच्या सहव्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे, पोलिस उपनिरीक्षक सायली पडवळ, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. मधुकर पाटील यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी उत्पन्नाचा दाखला, राष्ट्रीयत्वाचा दाखला, जात व नॉन क्रिमिलेअर दाखल्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

किरण कुलकर्णी म्हणाल्या, 'शासनाच्या योजनांची माहिती युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी महाविद्यालयांमध्ये समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे.'

प्रा. मधुकर पाटील म्हणाले, 'तरुणांनी मोबाईलचा अतिरेक टाळून कुटुंबासाठी, पुस्तके वाचण्यासाठी वेळ द्यावा. मित्रांशी संवाद साधा. अधिकाधिक ज्ञान मिळवा.'

कौस्तुभ गावडे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करावा; पण चॅट जीपीटी ॲप व एआयसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून ज्ञानात भर घालावी.' प्रा. प्रवीण बागडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

5

पुण्य नगरी
कोल्हापूर -
बुधवार, १३ ऑगस्ट २०२५

# प्रा. विराज जाधव यांच्या दोन उपकरणांना पेटंट

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयामधील बीबीए आणि एमबीए विभागप्रमुख प्रा. विराज जाधव यांनी डिझाईन केलेल्या एआय अनेबल्ड पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटर आणि एआय अनेबल्ड पोर्टेबल एअर प्युरिफायर या उपकरणांच्या संशोधनासाठी भारत सरकारकडून पेटंट प्राप्त झाले आहे. एखाद्या रुग्णास व्हेंटिलेटरवर ठेवल्यावर त्या व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये ठेवणे हे खर्चाचे व जिकिरीचे होते. अशावेळी पोर्टेबल इमर्जन्सी व्हेंटिलेटरमुळे रुग्णाला घरच्या घरी व्हेंटिलेटरची सुविधा देता येते. या संशोधनामध्ये प्रा. जाधव यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे विशेष सहकार्य लाभले.

# स्क्रीन टाईम हा स्टडी टाईम बनवा

## जिल्हाधिकारी येडगे; विद्यार्थी साहाय्यता जनजागृती अभियान



कोल्हापूर : जागतिक युवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी अमोल येडगे. यावेळी उपस्थित विविध मान्यवर.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युवक ही आपल्या देशाची शक्ती आहे. मजेत जीवन जगताना ध्येय निश्चित करा. व्यसनांपासून दूर राहा. स्क्रीन टाईम हा स्टडी टाईम बनवा. खडतर परिश्रम घेऊन उत्तम करिअर घडवा आणि यशस्वी होऊन जिल्ह्याचे नाव जगभरात उज्ज्वल करा, अशा शब्दांत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी यशस्वी जीवनाचा मूलमंत्र युवकांना दिला.

आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी साहाय्यता जनजागृती अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हा प्रशासन, सहायक आयुक्त समाज कल्याण, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व विवेकानंद कॉलेज यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

येडगे म्हणाले, महाविद्यालय व परिसर अमली पदार्थ व तंबाखूमुक्त राहण्यासाठी प्रयत्न करा. ध्येय निश्चित करा. ते पूर्ण करण्यासाठी खडतर परिश्रम घ्या. 'सारथी'च्या महाव्यवस्थापक संचालक किरण कुलकर्णी म्हणाल्या, विविध विभागांच्या वतीने शासकीय योजना राबवल्या जात आहेत. त्यांची माहिती युवकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाविद्यालयांत समन्वय समिती स्थापन होणार आहे. पोलिस उपनिरीक्षक सायली पडवळ यांनी, अमली पदार्थ सेवनाचे व सोशल मीडियाचे दुष्परिणाम सांगितले. मोबाईल ॲडिक्शन युवकांपुढील आव्हान, या विषयावर मधुकर पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रा. प्रवीण बागडे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले. यावेळी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, समाज कल्याण विभाग सहायक आयुक्त सचिन साळे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदींसह मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

कोल्हापूर, बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ पुढारी

# 'विवेकानंद'मध्ये डॉ. रंगनाथन जयंती साजरी

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. आर. आर. साळुंखे, बी. ए. नारे, बी. एस. खोत, अजित जाधव, सुरेश इंगळे, प्रमोदिनी जाधव, प्रियांका दुर्गुळे, प्रतीक पानारी यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी डॉ. रंगनाथन यांच्या जीवनकार्यावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

तरुण भारत संवाद शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५



कोल्हापूर : विद्यार्थी जनजागृती कार्यक्रमात जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचे स्वागत करताना

# स्क्रीन टाईम हा स्टडी टाईम बनवा, ध्येय निश्चित करा

- जिल्हाधिकारी अमोल येडगे
- आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी जनजागृती अभियान कार्यक्रम

प्रतिनिधी

कोल्हापूर

युवक ही आपल्या देशाची शक्ती असून मजेत जीवन जगताना ध्येय निश्चित करा. व्यसनांपासून दूर रहा. स्क्रीन टाईम हा बुक टाईम, ग्राउंड टाईम आणि स्टडी टाईम बनवा. अधिकाधिक ज्ञान मिळवा. खडतर परिश्रम घेऊन उत्तम करिअर घडवा आणि यशस्वी होऊन आपल्या जिल्ह्याचे नाव जगभरात उज्वल करा, अशा शब्दात यशस्वी जीवनाचा मूलमंत्र जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी युवकांना दिला.

जिल्हा प्रशासन, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थी सहाय्यता जनजागृती अभियान कार्यक्रम जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे पार पडला.

यावेळी समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन साळे, कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, व्याख्याते प्रा. मधुकर पाटील तसेच अन्य मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उत्पन्नाचा दाखला, राष्ट्रीयत्वाचा दाखला, जात व नॉन क्रिमीलेअर दाखल्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सारथी उपकेंद्राच्या सह व्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी म्हणाल्या, शासनाच्या योजनांची माहिती युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी महाविद्यालयांमध्ये समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे.

पोलीस उप निरीक्षक सायली पडवळ, व्याख्याते मधुकर पाटील यांनी मार्गदर्शन केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, आदर्श युवा घडवण्याचे मोलाचे कार्य स्वामी विवेकानंदांनी केले आहे. मोबाईलचा वापर करा, पण चॅट जीपीटी ॲप व एआयसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून ज्ञानात भर घाला. प्रा. प्रवीण बागडे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये भित्तिपत्रिका प्रकाशन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभागाच्या वतीने विवेक भित्तिपत्रिकेच्या 'श्रावणधारा' या विशेषांकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. कुंभार यांनी भित्तिपत्रिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या लेखन कलागुणांना व्यासपीठ मिळते, असे सांगितले. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन ऋतुजा बिरांजेने केले. प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले.

पुण्य नगरी
शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ | कोल्हापूर -

# डॉ. रंगनाथन यांच्यामुळे ग्रंथालये शास्त्रीय चाकोरीत : गावडे

कोल्हापूर : प्रतिनिधी

डॉ. रंगनाथन यांच्यामुळे ग्रंथालये साचेबद्ध शास्त्रीय चाकोरीत आली. विद्यार्थ्यांची पावले नेहमी ग्रंथालयाकडे वळावीत, हीच पावले जीवनाचा मार्ग दाखवतील, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

स्वागत व प्रास्ताविक सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी केले. आर. आर. साळुंखे, बी. ए. नारे, बी. एस. खोत, अजित जाधव, सुरेश इंगळे, प्रमोदिनी जाधव, प्रियांका घुर्गुळे, प्रतीक पानारी यांनी संयोजन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती कार्यक्रमात कौस्तुभ गावडे यांच्यासह मान्यवर.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, १७ ऑगस्ट २०२५

**विवेकानंद कॉलेज**

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी परेड संचलन सादर केले. संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य विरेन भिर्डी, प्राचार्य मनराज भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानिमित्ताने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये आयोजित केलेल्या समारंभात विवेकानंद कॉलेजमधील सेवानिवृत्त कर्मचारी, पुस्तक लेखक, नेट, सेट, पीएच. डी. पदवी प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्टाफ सेक्रेटरी डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन विभागप्रमुख प्रा. डॉ. विकास जाधव, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. संतोष कुंडले, प्रा. एस. पी. थोरात, डॉ. ई. बी. आळवेकर यांनी केले.

सकाळ TODAY
कोल्हापूर, सोमवार, १८ ऑगस्ट २०२५



कोल्हापूर : सृजन आनंद विद्यालयात आयोजित 'चला डोक्यात दगड भरूया' प्रदर्शनात दगडांची माहिती देताना विवेकानंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. अभिजित पाटील.

# सृजन आनंद विद्यालयात 'चला डोक्यात दगड भरूया' प्रदर्शन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. अभिजित पाटील यांचे 'चला डोक्यात दगड भरूया' या दगडांवर आधारित प्रदर्शनाचे सृजन आनंद विद्यालयात आयोजन केले होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त ते भरवले होते. डॉ. पाटील व प्रा. योगिता पाटील यांच्या संग्रहातील अग्निजन्य खडक, स्तरित खडक, रूपांतरित खडक, स्फटिके, प्रवाळ असे अनेक दुर्मीळ दगड मुलांना पाहायला मिळाले. वनस्पतीजन्य जीवाश्म, प्राणीजन्य जीवाश्म, डायनासोरच्या हाडांचे जीवाश्म प्रदर्शनात ठेवले होते. विद्यालयातील मुलांच्या संग्रहातील दगड, शंख, शिंपले, पक्ष्यांची पिसे, क्रिस्टल्स, गाड्या, चित्रसंग्रह, वनस्पतींची पाने, वेगवेगळ्या धबधब्यांचे पाणी, जुन्या पितळी वस्तू, ग्रामोफोन, रेकॉर्डसचे ८० संग्रह प्रदर्शनात होते. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी तमिळ, हिंदी, कानडी, गुजराती, बंगाली, मराठी भाषांमधील गाणी विद्यार्थ्यांनी सादर केली.

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५

# कंपनी सेक्रेटरी रोजगाराचे उत्तम क्षेत्र

## कौस्तुभ गावडे : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : 'कंपनी सेक्रेटरी हे एक रोजगाराचे उत्तम क्षेत्र आहे. वाणिज्य विभागातील अनेक रोजगाराच्या संधींमधील एक क्षेत्र म्हणजे कंपनी सेक्रेटरी. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी केवळ सनदी लेखापाल (सी.ए.) व बँकिंग क्षेत्र, स्पर्धा परीक्षा यातच नोकरीच्या संधी न शोधता कंपनी सेक्रेटरी यातही करिअर करण्यासाठीचा एक चांगला पर्याय म्हणून पहावे,' असे आवाहन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले.



कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात बोलताना कौस्तुभ गावडे, व्यासपीठावर जयदीप पाटील यांच्यासह अन्य मान्यवर.

विवेकानंद कॉलेजमधील 'आयक्यूएसी', वाणिज्य विभाग तसेच करिअर कौन्सिलिंग आणि पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून सी. एस. जयदीप पाटील यांनी कंपनी सेक्रेटरी होण्यासाठीच्या अभ्यासक्रमाची माहिती देऊन या क्षेत्रातील कायदा विषयाची थोडक्यात माहिती दिली. कंपनी सेक्रेटरी कंपनीच्या दृष्टीने करीत असलेल्या विविध कार्यांबद्दलची माहिती दिली. विद्यार्थ्यांना कंपनी सेक्रेटरी या क्षेत्रात करिअर करण्याचा सल्ला दिला. यावेळी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी कॉलेजने आयोजित केलेल्या विविध नोकरीविषयी व व्यक्तिमत्त्व विकासाच्या कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा व आपले भविष्य घडवावे, असे आवाहन केले. अमित कुमार यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी 'आयक्यूएसी' समन्वयक डॉ. श्रुती जोशी आणि प्रा. शिल्पा भोसले यांचे सहकार्य लाभले. यावेळी डॉ. ए. एम. मोहिते, डॉ. वाय. बी. माने, डॉ. यू. डी. दबडे, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

पुण्य नगरी
कोल्हापूर । शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५



# 'विवेकानंद 'मध्ये जनजागृती कार्यशाळा

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवात होणाऱ्या ध्वनिप्रदूषण, प्लास्टिक व थर्माकोलचा वापर, लेसर लाईट आणि जलप्रदूषण याबाबत जाणीव जागृती निर्माण करण्याच्या हेतूने कार्यशाळेचे आयोजन केले होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे जनजागृती केली. या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, प्रा.पी.आर.बागडे, प्रा. हेमंत पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. राजश्री पाटील, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर
शनिवार, २३ ऑगस्ट २०२५

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव जनजागृती कार्यशाळेस प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव काळातील ध्वनिप्रदूषण, प्लास्टिक व थर्मोकोलचा वापर याबाबत जागृतीसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी गणेशोत्सव काळात विविध प्रकारे होणाऱ्या प्रदूषणाबाबत माहिती दिली. हे प्रदूषण कसे टाळता येईल याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे जनजागृती केली. उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. हेमंत पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. राजश्री पाटील, एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर
रविवार, २४ ऑगस्ट २०२५

# विवेकानंद कॉलेजकडून जनजागृती मोहीम

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज भौतिकशास्त्र विभागामार्फत साऊंड सिस्टीमच्या आवाजाचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांनी बिंदू चौक येथे पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली. मोहिमेदरम्यान अनेक नागरिकांनी पोस्टरवरील माहिती वाचून सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी विभागप्रमुख डॉ. संजय लठ्ठे, डॉ. गणेश नवाथे, डॉ. सुमय्या इनामदार, प्रा. अविनाश पालकवाड, प्रा. अनुरथ गोरे, प्रा. प्रज्ञा पाटील, डॉ. कल्याणी खंडाळे, प्रा. मयुरी बराले, गणेश माने, प्रशांत पाटील उपस्थित होते. उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार व अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षाच्या डॉ. श्रुती जोशी व संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
। रविवार, २४ ऑगस्ट २०२५



# 'डीजे 'विरोधात विवेकानंद कॉलेजकडून जनजागृती

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज, भौतिकशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांनी समाजजागृतीसाठी एक अनोखा उपक्रम हाती घेतला. डीजे साउंड सिस्टीमच्या आवाजाचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांनी शनिवार, दि. २३ रोजी बिंदू चौक येथे सकाळी ९ ते ११ वाजता पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली. यावेळी भौतिकशास्त्र विभागाप्रमुख डॉ. संजय लट्ठे, डॉ. गणेश नवाथे, डॉ. सुमय्या इनामदार, प्रा. अविनाश गायकवाड, प्रा. अनुरथ गोरे, प्रा. प्रज्ञा पाटील, डॉ. कल्याणी खंडाळे, प्रा. मयुरी बराले, गणेश माने, प्रशांत पाटील, पुंडलिक हरेर आदी उपस्थित होते. यासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी
कोल्हापूर -
रविवार, २४ ऑगस्ट २०२५

# 'विवेकानंद' मध्ये रानभाज्या पाककृतींचे प्रदर्शन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागातर्फे आयोजित रानभाज्यांच्या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या पौष्टिक व औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्यांचा समावेश करण्यात आला होता. उपक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. उपक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. ए. बी. आळवेकर यांच्या हस्ते झाले.

डॉ. आळवेकर म्हणाले, रानभाजी हा स्थानिक आहारातील महत्त्वाचा घटक आहे. यामध्ये पोषण मूल्य आणि औषधी गुणधर्म आढळतात. विद्यार्थ्यांनी संशोधनाच्या



माध्यमातून या परंपरेचे जतन करणे गरजेचे आहे.

प्रदर्शनात कुई, पाथरी, शेवगा, तांदळी, घोळ, आंबुशी तसेच करटुले अशा २५ पेक्षा अधिक रानभाज्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी मत मांडले. पाककृतीचे परीक्षण प्रा. सई पाटील, गृहशास्त्र विभाग व प्रा. वर्षा पवार, संख्याशास्त्र विभागप्रमुख यांच्याद्वारे करण्यात आले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी आसावरी केसरकर व सिद्धी कराळे यांनी केले.

तरुण भारत संवाद

सोमवार, २५ ऑगस्ट २०२५



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे. सोबत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अमित कुमार, डॉ. शिल्पा जोशी आदी.

# कंपनी सेक्रेटरी रोजगाराचे उत्तम क्षेत्र

- मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मत

प्रतिनिधी

कोल्हापूर,

"कंपनी सेक्रेटरी हे एक रोजगाराचे उत्तम क्षेत्र आहे. वाणिज्य विभागातील अनेक रोजगाराच्या संधीमधील एक क्षेत्र म्हणजे कंपनी सेक्रेटरी. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी केवळ सनदी लेखापाल (सी.ए.) व बँकींग क्षेत्र, स्पर्धा परीक्षा यामध्येच नोकरीच्या संधी न शोधता कंपनी सेक्रेटरी यामध्येही करिअर करण्यासाठीचा एक चांगला पर्याय म्हणून पाहावे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजमधील आय.क्यु.ए.सी., वाणिज्य विभाग तसेच करिअर कौन्सीलींग आणि पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

कंपनी सेक्रेटरी होण्यासाठीच्या अभ्यासक्रमाची माहिती देऊन या क्षेत्रातील कायद्याविषयीची थोडक्यात माहिती दिली. कंपनी सेक्रेटरी कंपनीच्या दृष्टीने करीत असलेल्या विविध कार्याबद्दलची माहिती दिली. विद्यार्थ्यांना कंपनी सेक्रेटरी या क्षेत्रात करिअर करण्याचा सल्ला दिला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. आभार अमित कुमार यांनी मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, प्रा. शिल्पा भोसले, डॉ. ए. एल. मोहिते, डॉ. व्ही. बी. माने, डॉ. यु. डी. दबडे उपस्थित होते.

पुण्य नगरी www.epunyanagari.com
कोल्हापूर
बुधवार, २७ ऑगस्ट २०२५

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागामार्फत 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' या विषयावर विविध ठिकाणी सादरीकरण आणि पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले.



कोल्हापूर : पथनाट्याद्वारे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती करताना विद्यार्थी.

यामध्ये कोल्हापूर पब्लिक स्कूल, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेज, राष्ट्रसेवा प्रशाला शिरोली या संस्थांचा सहभाग होता. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'गेले गणपती कोणीकडे?' हे पथनाट्य विशेष आकर्षण ठरले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी मातीच्या मूर्तींचा वापर, प्लास्टिक सजावट व थर्माकोलचा वापर टाळणे, प्लास्टिकच्या ताट-ग्लासाऐवजी पुन्हा वापरता येणाऱ्या भांड्यांचा वापर करणे, डॉल्बी व लेसर शोमुळे होणारे प्रदूषण टाळणे यासारख्या महत्त्वपूर्ण बाबींविषयी प्रबोधन करण्यात आले. पारंपरिकतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचे मूल्य जपणारा गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश प्रभावीपणे दिला. अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सोनल चौंदे, डॉ. पल्लवी भोसले यांनी हा उपक्रम पार पाडला.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २७ ऑगस्ट २०२५



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये पथनाट्याद्वारे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती केली. (छाया : अर्जुन टाकळकर)

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे पथनाट्यातून जनजागृती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागामार्फत पर्यावरणपूरक गणेशोत्सव या विषयावर विविध ठिकाणी सादरीकरण आणि पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले.

जनजागरण उपक्रम कोल्हापूर शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये उत्साहाने राबविण्यात आला. त्यात कोल्हापूर पब्लिक स्कूल, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेज, राष्ट्रसेवा प्रशाला शिरोली या संस्थांचा सहभाग होता. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'गेले गणपती कोणीकडे?' हे पथनाट्य विशेष आकर्षण ठरले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी मातीच्या मूर्तींचा वापर, प्लास्टिक सजावट व थर्माकोलचा वापर टाळणे, प्लास्टिकच्या ताट-ग्लासाऐवजी पुन्हा वापरता येणाऱ्या भांड्यांचा वापर करणे, डॉल्बी व लेसर शोमुळे होणारे प्रदूषण टाळणे यासारख्या महत्त्वपूर्ण बाबींविषयी प्रबोधन करण्यात आले. पारंपरिकतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचे मूल्य जपणारा गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सोनल चोंदे व डॉ. पल्लवी भोसले यांनी उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

सकाळ TODAY
कोल्हापूर, बुधवार, २७ ऑगस्ट २०२५



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध शाळा, महाविद्यालयांत पथनाट्याद्वारे पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती केली.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव' या विषयावर विविध ठिकाणी सादरीकरण आणि पथनाट्याचे आयोजन केले. कोल्हापूर शहरातील हा जनजागरण उपक्रम विविध शाळा, महाविद्यालयांत उत्साहाने राबविण्यात आला. त्यात कोल्हापूर पब्लिक स्कूल, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी, गोखले कॉलेज, विवेकानंद कॉलेज, राष्ट्रसेवा प्रशाला शिरोली या संस्थांचा सहभाग होता. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'गेले गणपती कोणीकडे' हे पथनाट्य विशेष आकर्षण ठरले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी मातीच्या मूर्तींचा वापर, प्लास्टिक सजावट, थर्मोकोलचा वापर टाळणे, प्लास्टिकच्या ताट-ग्लासाऐवजी पुन्हा वापरता येणाऱ्या भांड्यांचा वापर करणे, लेसर शोमुळे होणारे प्रदूषण टाळणे यासारख्या कार्यांविषयी प्रबोधन केले. पारंपरिकतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचे मूल्य जपणारा गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश दिला. या उपक्रमाचे संयोजन डॉ. आसावरी जाधव, सोनल चोंदे, पल्लवी भोसले यांनी केले.

पुढारी देश-विदेश शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२५

# आंतरराष्ट्रीय क्लासिकल बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेशला उपविजेतपद



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

चंद्रपूर, नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय खुल्या क्लासिकल रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरचा खेळाडू ऋषीकेश कबनूरकर याने उपविजेतपद पटकाविले. स्पर्धेच्या १९०० रेटिंग गटात दुसऱ्या क्रमांकासह ५० हजार रुपयांचे पारितोषिक आणि चषक त्याने मिळविला. तसेच, ५३.६ फिडे रेटिंगची कमाईही केली. कस्तूब गुंड (पश्चिम बंगाल) याने अजिंक्यपदासह १ लाखाचे बक्षीस मिळविले.

ऋषीकेशने ९ फेरीत खेळताना ७ बोर्डवर मितांश दीक्षित (उत्तर प्रदेश) यांच्याशी डाव बरोबरीत करून ७ गुणांसह दहावा क्रमांक पटकाविला. ऋषीकेश हा अनुज ॲकॅडमीचा खेळाडू असून, स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत
शनिवार, ३० ऑगस्ट २०२५



मुंबई : येथील कार्यक्रमात महात्मा गांधी शिक्षा प्रतिभा सन्मान पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते स्वीकारताना सहकुटुंब डॉ. आरिफ महात.

# डॉ. महात यांना महात्मा गांधी शिक्षा प्रतिभा सन्मान

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभागप्रमुख आणि गझलकार डॉ. आरिफ महात यांना 'महात्मा गांधी शिक्षा प्रतिभा सन्मान' हा पुरस्कार प्राप्त झाला. हिंदुस्थानी प्रचार सभा, मुंबईच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो. अहिंदी प्रदेशामध्ये हिंदी भाषेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी तसेच अमुल्य काम केल्याबद्दल हा पुरस्कार दिला जातो. डॉ. महात यांचे आतापर्यंत एक गझलसंग्रह, तीन कविता संग्रह, दोन अनुवादित ग्रंथ, तीन समीक्षा ग्रंथ, सहा संपादित ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. या पुस्तकांसाठी विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार प्राप्त झालेबद्दल डॉ. महात यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार डॉ. श्रुती जोशी यांनी अभिनंदन केले.